
ePaper
| वर्ष - 7 । अंक - 326 | UDYAM-MH-26-0158827 |

# घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेतील आरोपी भावेश भिंडेला अटक



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 17 मे 2024 | पुणे-पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- पालखीच्या स्वागताला ध्वनिवर्धक नको
- गुंडगिरी सहन करणार नाही!
- मुस्लीम समाजाबाबत मोदींचं घूमजाव!
- किरणने सांगितला लग्नानंतर झालेल्या ट्रोलिंगचा अनुभव

## पिंपरी-चिंचवडकर सतर्क रहा..सावध रहा..

# वादळी तडाखा; होर्डिंग कोसळले!

### महापालिका प्रशासन सतर्क : दुर्घटनेत सुदैवाने जीवितहानी झाली नाही







। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी

**मुंबईच्या घाटकोपरमधील होर्डिंग दुर्घटना ताजी असताना गुरुवारी (ता. १६) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पुणे-नाशिक महामार्गाच्या सेवा रस्त्यावर मोशी येथे होर्डिंग कोसळले. पाऊस व वाऱ्यामुळे ही घटना घडली असून जीवितहानी झालेली नाही. मात्र, एक दुचाकी, एक टेम्पो आणि एका व्यावसायिक मोटारीचे नुकसान झाले.**

पुणे-नाशिक महामार्गावर मोशीकडून पुण्याकडे येणाऱ्या सेवा रस्त्यावर राजा शिवछत्रपती चौकालगत (वखार महामंडळ चौक) पाच होर्डिंग्ज आहेत. त्याखाली पत्राशेडची दुकाने आहेत. त्यात गॅरेज, गोदाम, हॉटेल, औषधे आदींचा समावेश आहे. पाचपैकी एक होर्डिंग कोसळले. त्याखाली एक दुचाकी, एक टेम्पो व एक मोटार सापडली. दुचाकी, टेम्पोचे अधिक नुकसान झाले.

टेम्पो व पत्राशेडमधील दुकानांवर होर्डिंग अडकल्याने जमिनीपर्यंत टेकले नाही. त्यामुळे, मोटारीचे फारसे नुकसान झाले



नाही. त्यात होर्डिंगच्या सळईचा एक तुकडा घुसला होता. तो बाजूला करून मोटार घेऊन चालक निघून गेला. त्यानंतर, अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. गॅस कटरच्या साहाय्याने अँगल कापून होर्डिंग बाजूला करण्याचे काम रात्री उशिरापर्यंत चालू होते. दरम्यान, वडगाव येथील एमआयडीसी रस्त्यावरही होर्डिंग पडल्याचा प्रकार घडला. परंतु, त्यात, कोणतेही नुकसान झाले नाही.

किवळे येथे होर्डिंग कोसळून पाच जणांचा गेल्या वर्षी बळी गेला होता. त्यानंतर, शहरातील अनधिकृत होर्डिंग्जवर कारवाई झाली होती. त्यात मोशीतील शिवछत्रपती चौकालगतच्या आठ होर्डिंग्जचाही समावेश होता. त्यानंतर, काही होर्डिंग पुन्हा उभे राहिले आहेत. त्यातीलच एक होर्डिंग गुरुवारी कोसळल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.

> “ शहरातील सर्व होर्डिंग्जबाबत संबंधितांची बैठक शुक्रवारी (ता. १७) होणार आहे. शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येत आहे, तसेच अनधिकृत होर्डिंग्जचे सर्वेक्षण सुरू असून सोमवारपासून कारवाई सुरू करण्यात येणार आहे.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका

## होर्डिंग मालकावर गुन्हा दाखल...

मोशी येथील राजा शिवछत्रपती चौकातील अधिकृत परवानगी असलेले २० बाय ४० फूट आकाराचे होर्डिंग कोसळल्याप्रकरणी होर्डिंगचे परवानाधारक आनंद अॅडव्हर्टायझिंगचे आनंद गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. शहरातील सर्व होर्डिंग्जबाबत संबंधितांची बैठक शुक्रवारी (ता. १७) होणार आहे. शहरातील सर्व होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येत आहे, तसेच अनधिकृत होर्डिंग्जचे सर्वेक्षण सुरू असून सोमवारपासून कारवाई सुरू करण्यात येणार आहे. तसेच, कोसळलेल्या होर्डिंगचा सांगडा हटविण्याचे काम सुरू असताना सर्व दुकाने बंद केली होती. महामार्गालगतच्या खांबांवरील वीजपुरवठा खंडित केला होता. मात्र, तेथील औषध दुकान सुरूच होते. त्यात ग्राहकांची ये-जाही सुरूच होती. कोणालाही घटनेचे गांभीर्य नसल्याचे दिसत होते.

# पालखीच्या स्वागताला ध्वनिवर्धक नको

## विठ्ठल नामाचा जयघोष सुरू असताना या आवाजामुळे विघ्न येते

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आषाढी पायी वारी सोहळा आळंदी आणि देहूतून मार्गस्थ होत असताना पालख्यांचे स्वागत ध्वनिवर्धकांच्या दणदणाटात केले जाऊ नये, अशी मागणी आळंदी, देहू देवस्थान आणि वारकऱ्यांकडून गुरुवारी करण्यात आली. श्री संत तुकाराम महाराज संस्थान आणि संतश्रेष्ठ श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान पालखी सोहळ्याबाबत पूर्वतयारी आढावा बैठकीत ही मागणी करण्यात आली.**



गेल्या काही वर्षांपासून पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दींपासून पुण्याच्या ग्रामीण हद्दीपर्यंत पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी, विसाव्याच्या ठिकाणी मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक लावले जातात. या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली.पालखी मार्गावरून सोहळा मार्गस्थ होत असताना शहरांच्या हद्दी, गावातील वेशींच्या ठिकाणी मोठ्या दिमाखात स्वागत कमानी उभारून पालख्यांचे स्वागत करण्यात येते. परंतु, या ठिकाणी रस्ते, महामार्गांच्या कडेला, विसाव्याजवळ असलेल्या ठिकाणी ध्वनिवर्धकांच्या भिंती उभारून मोठ्या आवाजात गाणे, घोषणा दिल्या जातात. त्यामुळे वारीच्या भक्तिमय सोहळ्यात आरत्या, भजन, कीर्तने, विठ्ठल नामाचा जयघोष सुरू असताना या आवाजामुळे विघ्न येते. विशेषतः वारीमध्ये ज्येष्ठ आणि महिला वारकऱ्यांची संख्या जास्त असल्याने आवाजामुळे त्रास झाल्याच्या घटना घडल्या असून अनेक पोलीस ठाण्यात तक्रारी देण्यात आल्या आहेत. मात्र, प्रत्यक्षात कारवाई झाली नसल्याचे देवस्थानांचे पदाधिकारी आणि वारकरी मंडळांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत तातडीने पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त आणि ग्रामीण पोलिस अधीक्षक यांना पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातून शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहात मार्गस्थ होण्यासाठी ध्वनिवर्धकांच्या आवाजांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी ध्वनिवर्धक लावले जातात. त्यामुळे भक्तिमय वातावरणावर परिणाम होत असून वारकऱ्यांना आवाजाचा त्रास होत आहे. तसेच पालखी मार्गांच्या ठिकाणावर सुरू असणाऱ्या विकास कामांचा राडारोडा काढणे, इंद्रायणी नदीत जलपर्णी काढावी, मैलामिश्रीत पाणी नदीत सोडू नये, दर्शनबारी-मंडप रांगेची समस्या दूर करावी, रस्ता रुंदीकरण अशा मागण्या केल्याची माहिती वारकरी महामंडळाचे उपाध्यक्ष डी.भोसले-पाटील यांनी दिली.गेल्या काही वर्षांपासून पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दींपासून पुण्याच्या ग्रामीण हद्दीपर्यंत पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी, विसाव्याच्या ठिकाणी मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक लावले जातात. या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली.पालखी मार्गावरून सोहळा मार्गस्थ होत असताना शहरांच्या हद्दी, गावातील वेशींच्या ठिकाणी मोठ्या दिमाखात स्वागत कमानी उभारून पालख्यांचे स्वागत करण्यात येते. परंतु, या ठिकाणी रस्ते, महामार्गांच्या कडेला, विसाव्याजवळ असलेल्या ठिकाणी ध्वनिवर्धकांच्या भिंती उभारून मोठ्या आवाजात गाणे, घोषणा दिल्या जातात.वारीमध्ये ज्येष्ठ आणि महिला वारकऱ्यांची संख्या जास्त असल्याने आवाजामुळे त्रास झाल्याच्या घटना घडल्या बैठकीत तातडीने पुणे आणि पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त आणि ग्रामीण पोलिस अधीक्षक यांना पालखी सोहळा पुणे जिल्ह्यातून शिस्तबद्ध पद्धतीने आणि उत्साहात मार्गस्थ होण्यासाठी ध्वनिवर्धकांच्या आवाजांवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### मैलामिश्रीत पाणी नदीत सोडू नये

आषाढी पायी वारी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी ठिकठिकाणी ध्वनिवर्धक लावले जातात. त्यामुळे भक्तिमय वातावरणावर परिणाम होत असून वारकऱ्यांना आवाजाचा त्रास होत आहे. तसेच पालखी मार्गांच्या ठिकाणावर सुरू असणाऱ्या विकास कामांचा राडारोडा काढणे, इंद्रायणी नदीत जलपर्णी काढावी, मैलामिश्रीत पाणी नदीत सोडू नये

# ...तर रद्द होणार आरटीईअंतर्गत प्रवेश!

## शिक्षण विभागाकडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशासाठी येत्या १७ ते ३१ मे या कालावधीत ऑनलाईन अर्ज भरावा लागणार आहे. त्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना शिक्षण विभागाने प्रसिद्ध केल्या आहेत.**



अर्ज करताना पालकांना दहा शाळांची निवड करावी लागणार असून, एकापेक्षा जास्त अर्ज भरल्याचे आढळल्यास अर्ज सोडतीसाठी विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जात चुकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द केला जाणार आहे.आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेबाबतच्या मार्गदर्शक सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्ध केल्या. प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे आर्थिक दुर्बल, वंचित, आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटकांतील बालकांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा, विनाअनुदानित शाळा, पोलीस कल्याणकारी शाळा (विनाअनुदानित) आणि महानगरपालिका शाळांमध्ये (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) पहिली किंवा पूर्वप्राथमिक या स्तरावर २५ टक्के राखावी जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. आरटीई प्रवेशासाठी या पूर्वी ऑनलाइन अर्ज केलेल्या विद्यार्थ्याच्या पालकांना पुन्हा नव्याने अर्ज करावा लागणार आहे. आधीच्या अर्जाचा २०२४-२५ या वर्षाच्या आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी असलेल्या पालकांच्या बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. २५ टक्के प्रवेश प्रक्रियेसाठी विचारपूर्वक १० शाळांची निवड करावी. शाळेपासून घरापर्यंतचे हवाई अंतर गुगल मॅपने निश्चित करायचे असल्याने शाळा निवडताना अंतराची बाब लक्षात घेऊन पालकांनी बलूनद्वारे निवासस्थनाचे ठिकाण निश्चित करण्यासाठी तो बलून जास्तीत जास्त पाच वेळाच निश्चित करता येईल. त्यामुळे पालकांनी निवासस्थानाचे स्थान अचूक नमूद करावे.

### चुकीची माहिती भरल्यास प्रवेश रद्द

अर्ज करताना पालकांना दहा शाळांची निवड करावी लागणार असून, एकापेक्षा जास्त अर्ज भरल्याचे आढळल्यास अर्ज सोडतीसाठी विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जात चुकीची माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द केला जाणार आहे.आरटीईच्या प्रवेश प्रक्रियेबाबतच्या मार्गदर्शक सूचना प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्ध केल्या.

## लोकसभा निवडणुकीसाठी चारही आमदार 'ऑनफिल्ड'

# आमदारांनी 'महायुती धर्म' जपला!

### GROUND REPORT: श्रीरंग बारणे, शिवाजीराव आढळराव यांच्या विजयासाठी कर्तव्यनिष्ठा

। पिंपरी । महाईन्यूज ।
विशेष प्रतिनिधी

**मावळ आणि शिरुर लोकसभा निवडणुकीसाठी पिंपरी-चिंचवडमधील चारही विद्यमान आमदारांनी 'महायुती धर्म'चे पालन केले. महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे आणि शिवाजीराव आढळराव पाटील यांना मताधिक्य देण्यासाठी 'कर्तव्यनिष्ठा' दाखवली. त्यामुळे महायुतीच्या 'परफॉर्मन्स रिपोर्ट'मध्ये विद्यमान आमदारांना 'ग्रीन' शेरा मिळाला आहे. परिणामी, आगामी विधानसभा निवडणुकीत विद्यमानांने तिकीट जवळपास निश्चित मानले जाते, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली.**




लोकसभा निवडणुकीकरिता मावळ आणि शिरुरमध्ये दि. १३ मे रोजी मतदान पार पडले. मावळमध्ये एकूण ५४.८७ टक्के मतदान झाले. तर शिरुरमध्ये ५४.१६ टक्के मतदान झाले आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीकरिता तीव्र दावेदार असलेल्या स्थानिक नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती.

विशेष म्हणजे, शहरातील तीनही विधानसभा मतदार संघात महायुतीचे वर्चस्व आहे. शहरातील चारपैकी तीन आमदार भाजपाचे आणि एक राष्ट्रवादी अजित पवार गटाचा आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या तुलनेत महायुतीची ताकद संख्यात्मकदृष्ट्या जास्त आहे.

मावळमधील चिंचवड विधानसभा मतदार संघात विद्यमान भाजपाच्या अमादार अश्विनी जगताप यांनी श्रीरंग बारणे यांच्या मताधिक्यासाठी मतदार संघात पूर्ण ताकदीने प्रचार केला. त्याला भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या संघटनात्मक ताकदीची जोड मिळाली. या मतदार संघात २ लाख ६ हजार ९५९ म्हणजे ५५.४२ टक्के मतदान झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुतीच्या सभा, रॅलीमध्ये जगताप यांनी सहभाग घेतला. या निवडणुकीत "हिच ती वेळ... लक्ष्मण भाउंच्या विरोधकाला पाडण्याची.." अशा प्रकारची बॅनरबाजी झाली. त्यावेळी आमदार जगताप यांनी महायुती आणि बारणे यांच्या समर्थनार्थ रान पेटवले. चिंचवडमध्ये बारणे आघाडीवर राहिल्यास त्याचे श्रेय जगताप यांना सर्वाधिक राहणार आहे.

दुसरीकडे, पिंपरी विधानसभा मतदार संघाचे विद्यमान आमदार अण्णा बनसोडे यांनी बारणेंच्या प्रचारासाठी पुढाकार घेतला. सुरूवातीला मावळ मतदार संघ राष्ट्रवादीसाठी सोडावा आणि अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना तिकिट द्यावे. या करिता बनसोडे आग्रही होते. मात्र, तिकीट वाटपानंतर अजित पवार यांचा निर्णय अंतिम अशी भूमिका घेत बनसोडे यांनी बारणेंच्या प्रचारासाठी सुरुवात केली. पिंपरीतील मताधिक्य ठेवण्यासाठी बनसोडे यांनी स्वत:ची यंत्रणा कामाला लावली. महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पिंपरीतील असल्यामुळे महायुतीच्या या मतदार संघात सर्वाधिक 'फोकस' केला होता. विद्यमान आमदार म्हणून बनसोडे यांनाही त्याचा फायदा झाला.

दरम्यान, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे यांनीही महायुतीचे उमेदवार बारणे यांच्या प्रचारासाठी संपूर्ण शहरात प्रचारासाठी दौरा केला. सभा, बैठका आणि बूथ प्रमुखांशी संपर्क ठेवला. भाजपाची संघटनात्मक ताकद महायुतीच्या दोन्ही उमेदवारांसाठी जमेची बाजु ठरली. याउलट, महाविकास आघाडीकडे सहानुभूती आणि भाजपा विरोधी मतदाना टक्का या दोन बाबी हिताच्या ठरल्या. पण, बूथ यंत्रणा आणि प्रचार नियोजनात महाविकास आघाडीचा विस्कळीतपणा दिसला.

#### महाविकास आघाडीतील इच्छुकांमध्ये रस्सीखेच...

महाविकास आघाडीतून पिंपरीमधील इच्छुक माजी आमदार गौतम चाबुकस्वार, माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांनी संजोग वाघेरे यांच्या प्रचारासाठी कंबर कसली.

तसेच, चिंचवडमधील शिवसेना माजी गटनेते राहुल कलाटे, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी प्रचारात सहभाग घेतला. तसेच, भोसरीतून माजी सत्तारुढ पक्षनेते एकनाथ पवार, शिवसेनेच्या माजी गटनेत्या सुलभा उबाळे, माजी नगरसेवक धनंजय आल्हाट यांनी अमोल कोल्हेंच्या प्रचारासाठी सक्रीयपणे सहभाग घेतला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीतील इच्छुकांमध्ये रस्सीखेच पहायला मिळाली.

#### भोसरीत महेश लांडगे 'फायर मोड'वर!

शिरुरमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे डॉ. अमोल कोल्हे आणि अजित पवार गटाचे शिवाजीराव आढळराव पाटील असा चुरशीचा सामना झाला. सुरूवातीला कोल्हे आघाडीवर वाटत होते. मात्र, प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात आढळराव पाटील यांनी वातावरण निर्मिती केली. भोसरीतील भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी जनसंवाद बैठकांचा धडाका लावला. तसेच, महायुतीकडून "१ लाखाचे मताधिक्य देणार.." असा दावा केल्यामुळे आढळराव पाटील यांना भोसरीत दिलासा मिळाला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची झालेली वादळी पावसातील सभा चर्चेचा विषय ठरला. या निवडणुकीत शेवटच्या टप्प्यात 'फायर मोड'वर असलेले महेश लांडगे यांचे विधानसभेतील महायुतीचे तिकीट मात्र 'फिक्स' झाले, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

---




# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणी कपातीची शक्यता!

### पवना धरणात पाणीसाठा कमी : महापालिका प्रशासनाचे नियोजन

।पिंपरी। महाईन्यूज ।
प्रतिनिधी

**शहरासाठी महापालिका पवना धरणातून दररोज 520 एमएलडी पाणी घेते. हे पाणी पवना नदीवरील रावेत बंधारा येथून अशुद्ध जलउपसा केंद्रात उचलले जाते. तेथून ते निगडी येथील सेक्टर क्रमांक 23 येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून ते संपूर्ण शहरात पुरविले जाते. गेल्या काही दिवसापांसून आंद्रातून होणारा अपुरा पाणी**



**पुरवठा आता सुरळीत झाला असून महापालिका 80 एमएलडी पाणी इंद्रायणी नदीवरील निघोजे येथील बंधाऱ्यातून उचलते.** हे पाणी चिखली जलशुद्धीकरण आणले जाते. तेथे पाणी शुद्ध करून चिखली, मोशी, च-होली, भोसरी परिसरातील नागरिकांना दिले जात आहे. एमआयडीसीकडून महापालिका सध्या 15 एमएलडी पाणी असे एकूण 615 एमएलडी पाणी शहराला दिले जात आहे.

पवना धरणात आजच्या तारखेला 28.93 टक्के पाणीसाठा असून हा 15 जुलै पर्यंत पुरेल एवढा आहे. परंतु, गतवर्षी 30.92 टक्के पाणीसाठा होता. त्यातुलनेत 1.99 टक्के कमी साठा आहे. तर, आंद्रा धरणात 35.37 टक्के पाणीसाठा आहे. हा पाणीसाठा जुलैअखेरपर्यंत पुरेल. त्यामुळे पाण्याची चिंता नाही. परंतु, पावसाने ओढ दिल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




# अखेर ममता दीदीचा सूर पालटला!

**देशात लोकसभा निवडणूक २०२४ ची धामधूम सुरु आहे. मतदानाचे सात टप्पे आहेत. त्यातील चार टप्प्यातील मतदान झाले आहे. यापूर्वी इंडिया आघाडीशी फटकून वागणाऱ्या तृणमुल काँग्रेसच्या प्रमुख, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता दीदींनी पुन्हा खेला होबेचा नारा दिला आहे. त्यांचा सूर पालटला आहे. आता चार टप्प्यातील मतदानानंतर ममता बॅनर्जी यांनी रणनीती बदलविली आहे. त्यांनी इंडिया आघाडीला बाहेरुन पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे.**



लोकसभा निवडणुकीपूर्वी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी इंडिया आघाडीची कोनशिला ठेवली. पण इमारत फळाला येण्यापूर्वीच ते पुन्हा भाजपच्या ताफ्यात जाऊन बसले. जागा वाटपावरुन तृणमूल काँग्रेसने वेगळी चूल मांडली. देशात अनेक ठिकाणी बेबनाव दिसला. पण महाराष्ट्रासह काही भागात काँग्रेसला इतर पक्षांनी चांगली साथ दिली. भाजपची लाट थोपविण्यासाठी या प्रयोगाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. चार जूनला लोकसभेचा निकाल हाती आल्यावर या इंडिया आघाडीचे यश-अपयश समोर येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या एकूण सात टप्प्यांपैकी चार टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आणखी तीन टप्प्यातील मतदान बाकी असून ते लवकरच पार पडेल. आता पाचव्या टप्प्यासाठी २० मे रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे सध्या सर्वच राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरू आहे. अशातच काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार येईल, असा दावा केला आहे. दुसरीकडे भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होतील, असा दावा केला आहे. असे असतानाच आता तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा तथा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी मोठी घोषणा केली आहे. इंडिया आघाडीला केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी तृणमूल काँग्रेस बाहेरून पाठिंबा देणार असल्याची भूमिका ममता बॅनर्जी यांनी जाहीर केली आहे. भारतीय जनता पार्टीच्या विरोधात देशातील विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडी स्थापन केली. या इंडिया आघाडीच्या माध्यमातून लोकसभा निवडणुका लढवल्या जात आहेत. मात्र, पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 'एकला चलो'चा नारा दिलेला आहे. कोणत्याही पक्षांबरोबर आघाडी केलेली नाही. मात्र, ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीशी नाते तोडलेलेही नाही. त्यामुळे ममता बॅनर्जी या इंडिया आघाडीमधून बाहेर पडल्याची चर्चा होती. मात्र, याबाबत आता ममता बॅनर्जी यांनी स्वतः:च भूमिका जाहीर केली आहे. पश्चिम बंगालमध्ये लोकसभेच्या ४२ जागा आहेत. त्यातील १८ जागांवर मतदान प्रक्रिया झाली आहे. तर २४ जागांवर मतदान होणार आहे. त्याचवेळी ममता बॅनर्जी यांनी गुरुवारी एक मोठी घोषणा केली आहे. इंडिया आघाडीला बाहेरुन पाठिंबा देऊन केंद्रात एक मजबूत सरकार आणणार असल्याचे त्या म्हणाल्या. हे नवीन सरकार जनतेच्या प्राधान्याने अडचणी सोडवेल. ममता बॅनर्जी यांनी यापूर्वी डावे आणि काँग्रेसवर राज्यात भाजप समर्थक असल्याचा आरोप लावला होता. पण आता त्यांनी थोडी नमती भूमिका घेतली आहे. त्यामुळे राजकीय विश्लेषक बुचकाळ्यात पडले आहेत. लोकसभा निवडणुकीआधी ममता बॅनर्जी यांनी एकला चलोरेचा निर्णय घेतला होता. त्यामुळे काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीला मोठा झटका बसला होता. त्यावेळी इंडिया आघाडीच्या कळपातून पहिला पक्ष बाहेर निघाला होता. ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीला झटका दिला होता. त्यांनी पश्चिम बंगालमध्ये स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी त्यांनी स्वबळावर निवडणूक लढविण्याची घोषणा केली. काँग्रेसने तृणमूलचा प्रस्ताव मानला नाही, म्हणून हा निर्णय घेतला असे त्यावेळी ममता बॅनर्जी यांनी सांगितले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वीA टीएमसी आणि काँग्रेसमध्ये जागावाटपावरुन वादविवाद सुरु होते. ज्यावेळी दोन्ही पक्षांमध्ये एकमत झाले नाही, त्यावेळी तृणमूलने एकट्याने लोकसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. लोकसभा निवडणुकीआधी इंडिया आघाडीची पहिली विकेट पडली अशी देशभरात चर्चा झाली. काँग्रेस पक्षासोबत माझी कुठलीही चर्चा झाली नाही असे ममता बॅनर्जी यांनी त्यावेळी सांगितले होते. 'पश्चिम बंगालमध्ये आम्ही एकट्याने निवडणूक लढवणार हे सुरुवातीपासून आम्ही सांगत आलोय. आमची एक धर्मनिरपेक्ष पार्टी आहे' असेही त्या म्हणाल्या होत्या.

## अचूक वेध »

### नेतान्याहूंची नाकेबंदी

***युद्धखुंद नेतान्याहू आता 'हमासस्तान'ची भीती दाखवत असले तरी 'तुमच्याकडे गाझाबाबत पुढील योजना आहे का?' हा प्रश्न त्यांना त्यांचेच सहकारी विचारू लागले आहेत..***

इस्रायल आणि हमास संघर्षामध्ये गाझा पट्टीत संयुक्त राष्ट्रांसाठी काम करणारे माजी भारतीय लष्करी अधिकारी कर्नल वैभव काळे यांचा गोळीबारात मृत्यू होणे अत्यंत दुर्दैवी आहे. भारतीय लष्करात उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतर, निवृत्त झाल्यानंतरही मानवतेची सेवा करण्याची आस कर्नल काळेंच्या मनात जिवंत होती. यासाठीच संयुक्त राष्ट्रांसाठी स्वयंप्रेरणेने सेवा देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्या सेवाभावी प्रेरणेचा असा अंत होणे हे खरोखरच क्लेशकारक. देशातील प्रचार कोलाहलात त्यांच्या मृत्यूची हवी तशी दखल सरकारने घेतलेली दिसत नाही. खरे तर परदेशात संघर्षभूमीत अशा प्रकारे भारतीय व्यक्तीचा मृत्यू होणे ही अतिशय गंभीर व दखलपात्र बाब. त्यातून कर्नल वैभव काळे हे भारताचे वरिष्ठ लष्करी अधिकारी होते आणि संयुक्त राष्ट्रांसाठी जबाबदारी निभावत होते.

कोणत्याही उत्सवाचा सामान्यांना जाच होऊ नये. मग तो कोणत्याही धार्मिक सणांचा असो की 'लोकशाहीचा उत्सव' म्हणवल्या जाणाऱ्या निवडणुकांचा. सार्वजनिक पातळीवर साजऱ्या होणाऱ्या या उत्सवात जनतेची कमीत कमी गैरसोय कशी होईल अथवा होणार नाही हे बघणे विविध प्रशासकीय यंत्रणांचे काम.

# जनतेची कमीत कमी गैरसोय कशी होईल

अलीकडे मात्र या कामगिरीचा अतिरेक होऊ लागल्याची शंका वारंवार येऊ लागली आहे. सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या उत्सवात मोठ्या नेत्यांच्या जाहीर सभा व 'रोड शो'च्या निमित्ताने रस्ते, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद करण्याचे प्रकार कमालीचे वाढले. सुरक्षेच्या दृष्टीने अतिमहत्त्वाच्या श्रेणीत येणाऱ्या नेत्याचा संबोधन कार्यक्रम असला की सामान्यांचे हाल ठरलेले आहेत. मग ते मुंबई, पुणे, नागपूर असो वा चंद्रपूर. परिस्थिती सर्वत्र सारखीच. इंदिरा गांधी तसेच राजीव गांधींच्या हत्येनंतर देशातील यंत्रणा नेत्यांच्या सुरक्षेविषयी अधिक दक्ष झाल्या; ते योग्यच. नेत्यांच्या जिवाला जपायलाच हवे. मात्र हे करताना सामान्यांना कमीत कमी त्रास होईल याकडे यंत्रणांनी लक्ष देणेसुद्धा तेवढेच गरजेचे. त्याकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे सध्या सामान्य नागरिक हैराण झालेले दिसतात. पंतप्रधान वा अतिमहत्त्वाच्या व्यक्तीची सभा असली की तीन किलोमीटरच्या



परिघातील वर्दळीची सारी ठिकाणे बंद केली जातात. हल्ली तर, नेत्यांचा 'रोड शो' असल्यास आदल्या रात्रीपासून रस्ते निर्मनुष्य केले जातात. वाहतूक वळवली जाते.

यामुळे होणाऱ्या कोंडीत हजारो लोक अडकून पडतात. 'शो' रस्त्यावर, पण 'मेट्रो बंद' हाही निर्णय ऐन वेळी घाईघाईने जाहीर केला जातो! यातून सामान्यजन, नोकरदार यांना भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांची दखल कोण घेणार? आपल्या रोडशोमुळे झालेल्या वाहतूककोंडीत अडकलेल्या रुग्णवाहिकेला वाट मोकळी करून दिली म्हणजे घेतली जनतेची काळजी असे या नेत्यांना वाटते काय? केवळ प्रसिद्धीसाठी दाखवलेल्या या औदार्यामुळे रुग्णांचा जीव वाचेल पण कोंडीत अडकलेल्या अनेकांचा श्वास गुदमरतो त्याचे काय? त्यांना वाऱ्यावर सोडायचे व आम्ही जनतेची काळजी करतो असे भाषणात सांगायचे हा दुटप्पीपणा नाही तर आणखी काय? दुर्दैव हे की भारतीय राजकारणात सक्रिय असलेला एकही नेता आपल्या आगमनामुळे लोकांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या असे सुरक्षा यंत्रणांना सांगताना दिसत नाही. ही आत्ममग्नता लोकशाहीत योग्य कशी ठरू शकते? सुरक्षा यंत्रणेत थोडी जरी चूक झाली तरी त्याचा गवगवा करून राजकारण करणाऱ्या नेत्यांमुळेच हा बंदोबस्तातला अतिरेक अलीकडे वाढत चालला. अशा कार्यक्रमांसाठी सुरक्षा उपायांची आखणी करताना रस्ते व वाहतूक बंद करण्याचे अमर्याद अधिकार पोलिसांना आहेत. मात्र त्याची सूचना जनतेपर्यंत पोहचवावी असेही बंधन त्यात आहे. प्रत्यक्षात अलीकडे पोलीस समाजमाध्यमावर या सूचना जाहीर करून मोकळे होतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गुंडगिरी सहन करणार नाही!

## मनोज जरांगेंचा धनंजय आणि पंकजा मुंडेंना इशारा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणासाठी लढणारे कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे आणि भारतीय जनता पार्टीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजा मुंडे या बहिण-भावावर टीका केली आहे. तसेच त्यांना निर्वाणीचा इशारा दिला आहे. जरांगे पाटील यांनी दावा केला आहे की "मुंडे बंधू-भगिनींचे कार्यकर्ते मला जिवे मारण्याच्या धमक्या देत आहेत. दोघेही आपापल्या कार्यकर्त्यांना माझ्याविरोधात समाज माध्यमांवर पोस्ट टाकायला सांगत आहेत.**



आहे हे लक्षात ठेवाबीडमधील नांदुर घाट गावात बुधवारी (१५ मे) रात्री झालेल्या दगडफेकीमध्ये अनेक जण जखमी झाले आहेत. या जखमी ग्रामस्थांना बीडमधील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून तिथे त्यांच्यावर उपचार चालू आहेत. दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी आज (१६ मे) रुग्णालयात जाऊन त्या जखमी तरुणांची भेट घेतली. या भेटीनंतर जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, "जेव्हा जेव्हा राजकारणी लोकांचे दगडाखालचे हात निघालेत तेव्हा तेव्हा त्यांनी समाजांवर अन्याय केला आहे. आता त्यांचे हात दगडाखालून निघालेत असं त्यांना वाटतंय. त्यामुळे ते मराठा समाजावर अन्याय करत आहेत."मनोज जरांगे पाटील म्हणाले, "मराठा समाजावर खूप आधीपासून अन्याय होत आला आहे. मराठा समाजाची मतं घ्यायची, त्यांच्या जीवावर मोठ व्हायचं आणि नंतर त्याच मराठा समाजाला संपवायचं हे धोरण या राजकारणांनी गेल्या अनेक वर्षांपासून राबवलं आहे. बीडमध्ये आमच्या बांधवांना मारहाण झाली आहे. मी या घटनेचा निषेध करतो. मराठा समाजाचं पाठबळ घ्यायचं, या पाठबळावर निवडून यायचं आणि मग मराठा समाजाला संपवायचं हे त्यांचं धोरण आहे. आधी त्यांचा जीवावर मोठं व्हायचं आणि मग त्यांचा जीव घ्यायचा. मला या लोकांना सांगायचं आहे की, तुम्हाला आमचा जीव हवाच असेल तर आम्ही देखील जीव द्यायला तयार आहोत,कारण सध्या आमचाही नाईलाज आहे."मनोज जरांगे पाटील म्हणाले, "मला त्या दोन्ही बहिण भावाला सांगायचं आहे, तुम्हाला आमचा जीव घ्यायचा असेल तर खुशाल घ्या, आम्ही देखील जीव द्यायला तयार आहोत. परंतु, आम्ही मागे हटणार नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय आम्ही मागे फिरणार नाही. बीडमध्ये मराठा तरुणांना झालेल्या मारहाणीची पोलिसांनी दखल घ्यावी त्या मुलांच्या अंगावर तलवारीचे वार करण्यात आले आहेत. त्यांना आई-बहिणीवरून शिवीगाळ झाली आहे. मी पोलीस अधीक्षकांना विनंती करतो की त्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन कारवाई करावी. राजकारणी मंडळी याप्रकरणी काहीच करणार नाहीत. कारण त्यांच्यावरचं संकट दूर झालं की ते असेच वागतात. परंतु, आता मराठा समाज स्वस्थ बसणार नाही. मराठा समाज आता एक झाला आहे.येऊन दाखव, त्या कार्यकर्त्यांना मी एवढंच सांगेन की, तुमच्या नेत्यांनादेखील महाराष्ट्रात फिरायचं आहे हे लक्षात ठेवा. मी त्यांची गुंडगिरी सहन करणार नाही."मला त्या कार्यकर्त्यांना सांगायचं आहे की तुमच्या नेत्यांनाही महाराष्ट्रभर फिरायचं आहे हे लक्षात ठेवाबीडमधील नांदुर घाट गावात बुधवारी (१५ मे) रात्री झालेल्या दगडफेकीमध्ये अनेक जण जखमी झाले आहेत.

### आम्ही देखील जीव द्यायला तयार

मनोज जरांगे पाटील यांनी आज (१६ मे) रुग्णालयात जाऊन त्या जखमी तरुणांची भेट घेतली. या भेटीनंतर जरांगे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, "जेव्हा जेव्हा राजकारणी लोकांचे दगडाखालचे हात निघालेत तेव्हा तेव्हा त्यांनी समाजांवर अन्याय केला आहे. आता त्यांचे हात दगडाखालून निघालेत असं त्यांना वाटतंय. त्यामुळे ते मराठा समाजावर अन्याय करत आहेत."मनोज जरांगे पाटील म्हणाले, "मराठा समाजावर खूप आधीपासून अन्याय होत आला आहे. मराठा समाजाची मतं घ्यायची, त्यांच्या जीवावर मोठ व्हायचं आणि नंतर त्याच मराठा समाजाला संपवायचं हे धोरण या राजकारणांनी गेल्या अनेक वर्षांपासून राबवलं आहे. बीडमध्ये आमच्या बांधवांना मारहाण झाली आहे. मी या घटनेचा निषेध करतो. मराठा समाजाचं पाठबळ घ्यायचं, या पाठबळावर निवडून यायचं आणि मग मराठा समाजाला संपवायचं हे त्यांचं धोरण आहे. आधी त्यांचा जीवावर मोठं व्हायचं आणि मग त्यांचा जीव घ्यायचा. मला या लोकांना सांगायचं आहे की, तुम्हाला आमचा जीव हवाच असेल तर आम्ही देखील जीव द्यायला तयार आहोत.

# "...तर मी मोदींसाठी धावून जाईन"

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हाकेला उद्धव ठाकरेंची साद?

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करत आहेत.**



मात्र एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी उद्धव ठाकरेंविषयी मवाळ भूमिका घेतली होती. उद्धव ठाकरे हे माझे मित्र असून "मी त्यांच्या अडचणीच्या काळात त्यांना मदत करण्यासाठी सर्वात आधी हजर असेन" असं वक्तव्य त्यांनी केलं होतं. मोदींच्या या वक्तव्यावर वेगवेगळ्या राजकीय प्रतिक्रिया समोर आल्या. मोदींच्या या वक्तव्यानंतर त्यांनी उद्धव ठाकरेंसाठी एनडीएचे दरवाजे उघडल्याची चर्चा सुरू झाली होती. यावर आता उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरे म्हणाले, "मोदींच्या अडचणीच्या काळातही मी सर्वात आधी धावून जाईन.नरेंद्र मोदी म्हणाले होते की "उद्धव ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र आहेत आणि माझे त्यांच्याशी खूप चांगले संबंध आहेत. ते आजारी असताना मी नेहमी त्यांना फोन करायचो. वहिनींना (उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे) फोन करून उद्धव ठाकरेंच्या तब्येतीची अधून मधून विचारपूस करायचो. शस्त्रक्रिया करण्यापूर्वी त्यांनी मला विचारलं होतं की तुम्ही काय सल्ला द्याल? त्यावर मी त्यांना म्हटलं होतं की सर्वात आधी उपचार करून घ्या, इतर चिंता सोडा, आधी शरीर जपा. बाळासाहेबांचा मुलगा म्हणून मी नेहमी त्यांचा सन्मान केला आहे आणि यापुढेही करत राहीन. उद्धव ठाकरे हे काही माझे शत्रू नाहीत. उद्या त्यांच्या अडचणीच्या काळात त्यांना सर्वात आधी मदत करणारा मीच असेन. परंतु, हे सगळं कुटुंब म्हणून... आमचे राजकीय मार्ग मात्र आता वेगळे आहेत. कुटुंब म्हणून मी त्यांच्याबरोबर असेन."मोदींच्या या वक्तव्यावर उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

### सरकारला गजनी सरकार म्हणतो

कारण आता ते मला नकली संतान म्हणत आहेत. त्यांची ही अशी वक्तव्ये ऐकून मी त्यांना आणि या सरकारला गजनी सरकार म्हणतो. कारण २०१४ च्या निवडणुकीत ते जे काही म्हणाले होते. ते त्यांना २०१९ च्या निवडणुकीत बिलकुल आठवत नव्हतं. २०१९ च्या निवडणुकीच्या वेळी त्यांनी ज्या घोषणा केल्या त्या २०२४ च्या निवडणुकीमध्ये ते विसरले. काल जे काही म्हणाले ते आज विसरतात. आज जे काही बोलतात ते उद्या विसरतील, अशी त्यांची परिस्थिती आहे.

# मुस्लीम समाजाबाबत मोदींचं घूमजाव!

## देशातील संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा : पंतप्रधान नरेंद्र मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**लोकसभा निवडणूक सुरू होऊन आता महिनाभराचा कालावधी होत आला आहे. आणखी १५ दिवसांनी शेवटचा टप्पा पार पडेल. या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे पहिल्या टप्प्यापासूनच प्रत्येक वळणावर निवडणुकीतील विषय बदलत गेले. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात भाजपा आणि मोदींनी "अब की बार ४०० पार"चा नारा दिला. नंतर मात्र त्याचा उल्लेख टाळला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संविधान बदलाच्या चर्चांमुळे हा नारा सोडला. तसेच भाजपाने २०४७ पर्यंत विकसित भारताची संकल्पना मांडली. पण, एवढ्या लांबचा धीर मतदारांमध्ये नसल्याचे पाहून ही घोषणाही मागे पडली.**

दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान मोदींनी थेट मुस्लीम समाजाला लक्ष्य केले, असे विरोधकांचे म्हणणे आहे. राजस्थानमधील प्रचारसभेत बोलताना मोदींनी मुस्लिमांना घुसखोर संबोधले. तसेच काँग्रेसचे सरकार आल्यानंतर हिंदू महिलांचे मंगळसूत्र काढून घेतले जाईल आणि अधिक मुले असणाऱ्यांना दिले जाईल, असेही ते म्हणाले. निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मात्र मी मुस्लिमांच्या घरात वाढलो, एकत्र ईद साजरी केली, असे म्हणण्यापर्यंत परिस्थिती कशी बदलत गेली याचा घेतलेला हा आढावा.१९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्याचे मतदान झाल्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे २१ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदींनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका करताना मुस्लीम समाजाला लक्ष्य केले.त्यामुळे काँग्रेस आणि भाजपाच्या जाहीरनाम्याची चर्चा बाजूला पडून हिंदू-मुस्लीम विषय केंद्रस्थानी आला. पुढे अलीगढ येथील एका सभेत मोदींनी पुन्हा एकदा काँग्रेसला लक्ष्य केले. "काँग्रेसचे सरकार आल्यास ते माता-भगिनींच्या सोन्याचा हिशेब करतील आणि मग ती संपत्ती वाटून टाकतील. मनमोहन सिंग सरकारने म्हटले होते की, देशातील संपत्तीवर पहिला अधिकार मुस्लिमांचा आहे. ही अर्बन नक्षल विचारधारा तुमचे मंगळसूत्रही वाचू देणार नाही", अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली.साहजिकच पंतप्रधानांच्या विधानांवर विरोधकांनी नाराजी व्यक्त केलीच, त्याशिवाय जागतिक माध्यमांनीही याची गंभीर दखल



घेतली. द वॉशिंग्टन पोस्टने म्हटले, "स्वातंत्र्यानंतर भारतातील नेत्यांनी देशाला धर्मनिरपेक्ष, बहुसांस्कृतिक लोकशाहीच्या मार्गावर नेले होते; पण मोदींच्या पक्षाने या सर्वांच्या विपरित असा हिंदू दृष्टिकोन रेटला आहे. मोदींच्या काळात अल्पसंख्याकांवर लज्जास्पद असे हल्ले होत आहेत." न्यूयॉर्क टाइम्सने लिहिले, भारतातील सर्वात मोठ्या अल्पसंख्याक समाजाविरोधात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वापरलेली थेट भाषा ही त्यांच्या जागतिक मंचावरील प्रतिमेशी विसंगत अशी आहे.सीएनएन वृत्तसंस्थेने म्हटले की, मोदींचे विधान भाजपाच्या हिंदू राष्ट्रवादाच्या संकल्पनेला आणखी बळ देणारे आहे. त्यामुळे या फुटीरतावादी विधानावर विरोधकांनी टीका केली आहे. तसेच गेल्या दशकभरात मोदी आणि भाजपाने हिंदू राष्ट्रवादी धोरण राबविताना धार्मिक ध्रुवीकरण केल्याचाही आरोप विरोधकांनी केला आहे, ज्यामुळे भारतासारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशात इस्लामोफोबिया आणि अतिशय टोकाचा असा जातीय संघर्ष निर्माण झालेला दिसतो. पंतप्रधान मोदींनी मुस्लिमांना घुसखोर म्हटल्यानंतर त्याची प्रतिक्रिया उमटली. संविधान बचाओ नागरिक अभियान या संस्थेकडून निवडणूक आयोगाकडे तक्रारीचे पत्र पाठविण्यात आले, अशी बातमी स्क्रोलने दिली. १७,४०० लोकांनी या पत्राखाली स्वाक्षरी देऊन पाठिंबा दिल्याचा दावा या बातमीत करण्यात आला. पंतप्रधान मोदींनी आदर्श आचारसंहिता आणि लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ चे उल्लंघन करणारे विधान केले आहे. तसेच हिंदू आणि मुस्लीम समुदायाला एकमेकांविरोधात भडकविण्याची चिथावणी दिल्याचा आरोप या पत्राद्वारे करण्यात आला. "काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यात हिंदू महिलांकडे असलेल्या सोन्याची गणती करून ते मुस्लीम समाजाला वाटण्याबाबतचा कोणताही उल्लेख नसतानाही पंतप्रधान मोदी आपल्या भाषणातून असत्याचा प्रचार करत आहेत", असाही आरोप या पत्राद्वारे करण्यात आला. या पत्राशिवाय २,२०९ लोकांनी स्वाक्षरी केलेली एक याचिकाही दाखल झाली. या याचिकेद्वारे निवडणूक आयोगाच्या लक्षात आणून देण्यात आले की, पंतप्रधान मोदी मते मिळविण्यासाठीच मुस्लीम समुदायाबद्दल अपमानास्पद भाषेचा वापर करत आहेत. भारताला जगभरात लोकशाहीची जननी असे संबोधले जाते. मात्र, मोदींच्या या विधानामुळे भारताची प्रतिमा मलीन होत आहे.

### निवडणूक आयोगाकडे तक्रार

अहवाल प्रसिद्ध करण्यास हीच वेळ का साधण्यात आली, असे प्रश्न उपस्थित केले गेले. या अहवालातील माहितीनुसार, १९५० ते २०१५ या काळात भारतात बहुसंख्य असलेल्या आणि प्रमुख धर्म असलेल्या हिंदूंच्या लोकसंख्येत ७.८ टक्क्यांची घसरण दिसून आल्याचे म्हटले आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येतील हिंदूंचा वाटा १९५० साली ८४ टक्के इतका होता, तो २०१५ साली कमी होऊन ७८ टक्क्यांपर्यंत कमी झाला; तर मुस्लीम धर्मीय लोकसंख्येचा वाटा १९५० साली ९.८४ टक्के इतका होता. मात्र, त्यामध्ये आता वाढ होऊन ही संख्या १४.०९ टक्क्यांवर पोहोचली आहे, असेही अहवालात म्हटले गेले.पंतप्रधान मोदींनी थेट मुस्लीम समाजाला लक्ष्य केले, असे विरोधकांचे म्हणणे आहे. राजस्थानमधील प्रचारसभेत बोलताना मोदींनी मुस्लिमांना घुसखोर संबोधले. तसेच काँग्रेसचे सरकार आल्यानंतर हिंदू महिलांचे मंगळसूत्र काढून घेतले जाईल आणि अधिक मुले असणाऱ्यांना दिले जाईल, असेही ते म्हणाले. निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मात्र मी मुस्लिमांच्या घरात वाढलो, एकत्र ईद साजरी केली, असे म्हणण्यापर्यंत परिस्थिती कशी बदलत गेली याचा घेतलेला हा आढावा.

# कोवॅक्सिन लसीचे दुष्परिणाम उघडकीस!

## कोवॅक्सिन लसीमुळे अनेकांना गंभीर आजार होऊ शकतात

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोरोना विषाणूपासून संरक्षण करण्यासाठी लोकांना कोविशील्ड आणि कोवॅक्सिनची लस दिली गेली. यापूर्वी ॲस्ट्राझेनेका या ब्रिटीश कंपनीने कबूल केले होते, की या लसीचे काही दुष्परिणाम होऊ शकतात, परंतु आता कोवॅक्सिनबाबतही धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

कोविशील्ड बनविणाऱ्या ॲस्ट्राझेनेका या ब्रिटीश कंपनीने नुकतेच न्यायालयात कबूल केले होते, की या लसीमुळे अनेकांना गंभीर आजार होऊ शकतात. दुसरीकडे, जर आपण कोवॅक्सिनबद्दल बोललो तर आता त्याचे दुष्परिणाम देखील समोर येत आहेत. एका अहवालानुसार, वर्षभरानंतर अनेकांना याचे दुष्परिणाम दिसू लागले आहेत. एवढेच नाही तर किशोरवयीन मुलींवर याचा सर्वाधिक परिणाम होत आहे, काही दुष्परिणाम खूप गंभीर होते. या लसींबाबत एक 'निरीक्षण अभ्यास' करण्यात आला, ज्यामध्ये लस घेतलेल्या एक तृतीयांश लोकांमध्ये दुष्परिणाम आढळून आले आहेत. हा अभ्यास अहवाल स्प्रिंगर लिंक जर्नलमध्ये प्रकाशित करण्यात आला आहे. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या सांखा




शुभ्रा चक्रवर्ती आणि त्यांच्या टीमने हा अभ्यास केला आहे. या अहवालानुसार, लस घेतलेल्या बहुतेक लोकांमध्ये एक वर्षापासून दुष्परिणाम दिसून आले. तथापि, या अभ्यासात १०२४ लोकांचा समावेश करण्यात आला होता. या सर्व लोकांशी फॉलो-अप तपासणीसाठी संपर्क करण्यात आला. अभ्यासात, ३०४ किशोरवयीन म्हणजे सुमारे ४८ टक्के जणांमध्ये 'व्हायरल अप्पर रेस्पिरेटरी ट्रॅक्ट इन्फेक्शन' दिसले. या व्यतिरिक्त, १०.५ टक्के किशोरवयीन मुलांमध्ये 'न्यू-ऑनसेट स्किन ॲंड सबक्टेनियस डिसऑर्डर', १०.२ टक्केमध्ये सामान्य विकार, ४.७ टक्केमध्ये मज्जासंस्थेचा विकार म्हणजेच मज्जातंतूशी संबंधित समस्या दिसून आली. ॲस्ट्राझेनेकाची कोविड-१९ लस कोविशील्ड वादात सापडल्याच्या काही आठवड्यांनंतर, भारत बायोटेकच्या कोवॅक्सिनमुळेही काही दुष्परिणाम होत असल्याचे एका नवीन अभ्यासात आढळून आले.आहे की, ज्या किशोरवयीन मुलींना ॲलर्जीचा इतिहास होता त्यांना कोवॅक्सिन लस घेतल्यानंतर अपस्मार आजार होण्याचा धोका जास्त आहे.

### 1 टक्के लोकांमध्ये गंभीर दुष्परिणााम

अहवालानुसार, लसीचे दुष्परिणाम तरुण मुलींमध्येही दिसून आले. ४.६ टक्के महिलांमध्ये मासिक पाळीच्या समस्या आढळून आल्या आहेत. २.७ टक्केमध्ये डोळ्यांशी संबंधित समस्या दिसून आल्या आहेत. ०.६ टक्केमध्ये हायपोथायरॉईडीझम आढळले आहे. याशिवाय, १ टक्के लोकांमध्ये गंभीर दुष्परिणााम आढळले आहे. त्याच वेळी, स्ट्रोकची समस्या ३०० पैकी एकामध्ये दिसून आली आहे आणि १०० पैकी एकामध्ये गुइलेन-बॅरे सिंड्रोम दिसला आहे. या अभ्यासात असेही दिसून आले आहे, की या लसीमुळे थायरॉईड सारख्या आजाराचा परिणाम तरुण आणि किशोरवयीन महिलांमध्ये दिसून आला आहे.

# किरणने सांगितला लग्नानंतर झालेल्या ट्रोलिंगचा अनुभव

अभिनेता आमिर खानने किरण रावशी दुसरं लग्न केलं होतं. आमिर व रीना दत्ता यांचा घटस्फोट झाल्यावर त्याने किरणशी लग्न केलं होतं. किरण चश्मा लावते, त्यामुळे आमिरशी लग्न केल्यावर खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता, असा किरण रावने खुलासा केला आहे. लोक तिच्या लूकची खिल्ली उडवायचे, असं ती म्हणाली. किरण व आमिर तीन वर्षांपूर्वी विभक्त झाले आहेत. पण ते त्यांच्या मुलाचा एकत्र सांभाळ करतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत किरणने महिला दिग्दर्शकांना त्यांचे चित्रपट प्रदर्शित करताना येणाऱ्या आव्हानांबद्दल विधान केलं. इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांना मिळणाऱ्या सन्मानाबद्दल ती बोलली. याचबरोबर तिने आमिर खानशी लग्न केल्यावर झालेल्या टीकेबाबतही सांगितलं.किरणने आमिरशी लग्न केल्यानंतर तिला ट्रोल करण्यात आलं होतं. 'कोणत्या चश्मिष महिलेशी आमिर खानने लग्न केलंय?', असं लोक म्हणायचे. लोकांचं विविध प्रकारचं बोलणं ऐकूनही आपण नेहमीच आपल्या स्वातंत्र्याला महत्त्व दिलं आणि आपलं काम सुरू ठेवलं, असं ती सांगते. तसेच आता मी अशा टप्प्यावर पोहोचली आहे जिथे इतरांच्या मतांना मी महत्त्व देत नाही,





असंही तिने नमूद केलं.किरणच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास नुकताच तिचा 'लापता लेडीज' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेला हा चित्रपट हिट झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला खूप चांगला प्रतिसाद मिळाला.लोक तिच्या लूकची खिल्ली उडवायचे, असं ती म्हणाली. किरण व आमिर तीन वर्षांपूर्वी विभक्त झाले आहेत. पण ते त्यांच्या मुलाचा एकत्र सांभाळ करतात. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत किरणने महिला दिग्दर्शकांना त्यांचे चित्रपट प्रदर्शित करताना येणाऱ्या आव्हानांबद्दल विधान केलं. इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या तुलनेत महिलांना मिळणाऱ्या सन्मानाबद्दल ती बोलली. याचबरोबर तिने आमिर खानशी लग्न केल्यावर झालेल्या टीकेबाबतही सांगितलं. किरणने आमिरशी लग्न केल्यानंतर तिला ट्रोल करण्यात आलं होतं. 'कोणत्या चश्मिष महिलेशी आमिर खानने लग्न केलंय?', असं लोक म्हणायचे.

## प्रियांकाने साजरी केली धुळवड

होळीचा सण आला आणि काल धुळवड मोठ्या प्रमाणात साजरी झाली. मनोरंजनसृष्टीतील अनेक कलाकारांनी मोठ्या उत्साहात रंगपंचमी साजरी केली.
बॉलीवूडमधील अनेक कलाकारांचे रंगपंचमी साजरी करतानाचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले.
बॉलीवूडचं लोकप्रिय कपल प्रियांका आणि निकनेसुद्धा काल होळीचा आनंद लुटला.
चोप्रा कुटुंबाने भव्य होळीची पार्टी आयोजित केली होती. प्रियांका आणि निक जोनासची लाडकी लेक मालतीची भारतातली ही पहिलीच धुळवड होती.
होळीतील प्रियांका, निक आणि मालतीचे फोटो सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहेत. यातल्या एका फोटोमध्ये प्रियांका तिचा मित्रपरिवार आणि कुटुंबाबरोबर दिसतेय. यात मालतीने सफेद रंगाचा ड्रेस आणि टोपी घातली आहे.

## दियाचा प्रोजेक्ट काय ?

बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री दिया मिर्झाचा नवा प्रोजेक्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या प्रोजेक्टमध्ये काही मराठी कलाकारांची वर्णी लागली आहे. या मराठी कलाकारांनी सोशल मीडियावर पोस्ट करून दियाच्या नव्या प्रोजेक्टची माहिती दिली आहे. दिया मिर्झाची 'पन्हं' या नावाची नवीन शॉर्ट फिल्म भेटीस येत आहे. या शॉर्ट फिल्मची दिया ही निर्माती असून यामध्ये बरेच मराठी कलाकार झळकणार आहे. यात 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप पाहायला मिळणार आहे. यासंदर्भात त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली. "हृदयाच्या कोपऱ्यातला अत्यंत लाडका प्रोजेक्ट..'पन्हं'", असं कॅप्शन लिहीत त्याने काही फोटो शेअर केले आहेत.याशिवाय पृथ्वीकसह अभिनेत्री सायली संजीव देखील दियाच्या आगामी प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. तिने देखील इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रोजेक्टसंबंधित पोस्ट शेअर केली आहे. "या प्रोजेक्टचा एक भाग होण्याचा मला खूप आनंद आहे," असं लिहून तिने एक फोटो शेअर केला आहे.पृथ्वीक प्रताप व सायली संजीवबरोबर अभिनेता सुहास शिरसाट देखील 'पन्हं' या शॉर्ट फिल्ममध्ये झळकणार आहे. यासंदर्भात सुहासने इन्स्टाग्राम स्टोरी शेअर केली आहे. "एका दमदार टीमबरोबर नवीन काम", असं लिहितं अभिनेत्याने क्लॅपचा फोटो शेअर केला आहे.दरम्यान, दिया मिर्झाची ही शॉर्ट फिल्म काय आहे?



## लाथ मारल्यामुळे वरुण भडकला

आयपीएलच्या हंगामाला नुकतीच सुरुवात झाली असून, रविवारी मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्सचा सामना पार पडला. सामन्यादरम्यान अचानक एक श्वान मैदानात घुसल्याने सगळ्यांची तारांबळ उडाली. पोलीस आणि इतर लोक त्या धावत्या श्वानाला पकडण्यासाठी पाय मधे टाकून त्याला अडविण्याचा प्रयत्न करत होते.
हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. या प्रकारामुळे बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी संताप व्यक्त केला आहे.
मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्या जेव्हा गोलंदाजीसाठी सज्ज झाला तेव्हा श्वान मैदानात घुसला. त्यामुळे सामना थोडा वेळ थांबविण्यात आला. हार्दिक पांड्याने कुत्र्याला आपल्याकडे बोलावले असता, स्टेडियममधील ग्राउंड स्टाफने पाठलाग करून, कुत्र्याला मैदानातून हाकलून दिले.'स्ट्रीट डॉग्स ऑफ बॉम्बे'च्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर हा व्हिडीओ शेअर करण्यात आला होता.
श्वानाला अथकपणे लाथ मारल्यामुळे आणि त्याचा पाठलाग केल्याबद्दल त्यांनी ग्राउंड स्टाफला फटकारले. हा व्हिडीओ आपल्या स्टोरीवर शेअर करीत, वरुण धवनने आपला संताप व्यक्त केला. "श्वान काही फुटबॉल नाही. श्वान कोणाला नुकसान पोहोचवत नाही किंवा तो चावतही नाही आहे. बेपर्वाईनं वागण्यापेक्षा याबाबत एक चांगला मार्ग योजणं आवश्यक आहे," अशा शब्दांत वरुणने श्वानाबरोबर गैरवर्तन करणाऱ्यांना फटकारले.
सामन्यादरम्यानचा श्वानाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. श्रद्धा कपूरचा भाऊ सिद्धांत कपूरनेसुद्धा कमेंट करीत आपला राग व्यक्त केला आहे.

## मी शाहरुख खानसमोर तासभर रडले होते



प्रसिद्ध कोरिओग्राफर व दिग्दर्शक फराह खान आणि शाहरुख खान खूप जवळचे मित्र आहेत. एका मुलाखतीत, फराहला ४० व्या वर्षी आयव्हीएफद्वारे गर्भधारणा झाली, होती. ती तीन बाळांना जन्म देणार आहे, ही आनंदाची बातमी कुटुंबाबाहेरच्या कुणाला दिली असेल तर तो शाहरुख पहिला होता, असा खुलासा फराहने केला आहे. 'ओम शांती ओम'चे शूटिंग करत असताना फराह गरोदर होती, त्यावेळी शाहरुख सेटवर खूप काळजी घ्यायचा, असं फराहने सांगितलं.नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी यूट्यूब चॅनलला दिलेल्या मुलाखतीत फराहने सांगितलं की ती शूटच्या आधी आणि नंतर आयव्हीएफ उपचारांसाठी जायची. ते क्लिनिक सेटपासून एक तासाच्या अंतरावर होते. सुरुवातीला उपचारात खूप अडचणी येत होत्या, तेव्हा सेटवर परत येताना रडायचे, असं फराह म्हणाली."पहिल्या पाच-सहा महिन्यांत खूप त्रास झाला. मला खूपदा डॉक्टरांनी भूल दिली होती. एकदा डॉक्टरकडे गेल्यावर मला खात्री होती की मी गरोदर आहे, पण मला दवाखान्यातच मासिक पाळी आली. त्यानंतर बऱ्याचदा मी दवाखान्यातून शूटिंगला परत येईपर्यंत रडत असे.
एके दिवशी मध्यरात्री मला डॉक्टरांचा फोन आला आणि सांगितलं की मी गरोदर नाही. आम्ही एक कॉमिक सीन शूट करत होतो. शाहरुखला कळालं की मला काहीतरी झालंय, कारण मी रडण्याच्या तयारीत होते. मग त्याने सर्वांना ब्रेक दिला आणि मला त्याच्या व्हॅनमध्ये नेलं, असं फराह म्हणाली.मी म्हणाले, 'मला तुला काहीतरी सांगायचं आहे'. त्याने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाला, 'तू गरोदर आहेस का?' आम्हाला दर्दे-ए-डिस्को गाण्याचं शूटिंग संपवायचं होतं आणि प्रत्येक वेळी तो शर्ट काढायचा तेव्हा मी त्याचं शर्ट वर फेकून देत असे. तो माझ्यासमोर बादली ठेवायचा.

# हैदराबाद प्लेऑफसमध्ये दाखल!

## » हैदराबादचे आता 13 सामन्यांतून 15 गुण झाले आहेत

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यातील सामना पावसामुळे वाया गेला. सततच्या पावसामुळे मैदान संपूर्ण वेळ कव्हरने झाकले गेले होते. त्यामुळे सामना अधिकाऱ्यांनी सामना रद्द केला. ज्यामुळे सनरायझर्स हैदराबादचा संघ प्लेऑफ्समध्ये पोहोचला आहे. हा सामना रद्द झाल्यामुळे हैदराबाद आणि गुजरात या दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. हैदराबादचे आता १३ सामन्यांतून १५ गुण झाले आहेत आणि संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. चेन्नई सुपर किंग्ज वगळता इतर कोणत्याही संघाला १५ किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळू शकत नाहीत. या स्थितीत हैदराबादचा संघ प्लेऑफ्ससाठी पात्र ठरला.**






हैदराबाद आणि गुजरात यांच्यातील सामना हैदराबादच्या उप्पल स्टेडियमवर होणार होता, मात्र मुसळधार पावसामुळे नाणेफेक होऊ शकली नाही. पाऊस थांबत नव्हता आणि शेवटी रात्री साडेदहा वाजता शेवटची वेळ निश्चित करण्यात आली की पाऊस थांबल्यास दोन्ही संघांमध्ये प्रत्येकी पाच षटकांचा सामना खेळवला जाईल. उप्पल स्टेडियमवर सामना पाहण्यासाठी आलेल्या क्रिकेट चाहत्यांची मात्र हवामानाने निराशा केली. त्यामुळे शेवटी रात्री साडेदहा वाजता अधिकृतपणे रद्द झाल्याचे घोषित करण्यात आले. त्यामुळे विभागून मिळालेल्या एका गुणाच्या जोरावर हैदराबादचा संघ प्लेऑफ्ससाठी पात्र ठरला.सनरायझर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यातील सामना पावसामुळे रद्द झाल्याने याचा फटका अन्य दोन संघांना बसला आहे. प्लेऑफ्सबाबत बोलायचे झाले, तर दिल्ली कॅपिटल्स संघ कोंडीत अडकला होता, जो प्लेऑफ्सच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे. बंगळुरू आणि लखनऊचे प्रत्येकी १२ गुण आहेत. तथापि, लखनऊचा निव्वळ धावगती खूपच नकारात्मक आहे आणि त्याची भरपाई करणे त्यांच्यासाठी कठीण होईल. अशा स्थितीत चेन्नई आणि बेंगळुरू यांच्यातील सामना आभासी नॉकआऊट मानला जात आहे. पण गुजरात विरुद्धचा सामना पावसाने रद्द झाल्यामुळे हैदराबादला एक गुण मिळाला आहे आणि त्याचे एकूण १५ गुण झाले आहेत. दिल्ली आणि लखनऊ १५ गुणांपर्यंत पोहोचू शकत नसल्यामुळे, हैदराबाद आता आयपीएल २०२४ च्या प्लेऑफमध्ये जाणारा तिसरा संघ बनला आहे. त्याआधी, केकेआर (१९) आणि राजस्थान रॉयल्स (१६) यांनी आधीच टॉप-४ मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे.पावसाने व्यत्यय आणलेला या मोसमातील हा तिसरा सामना आहे. यापूर्वी कोलकाता आणि मुंबई यांच्यातील सामन्यावरही पावसाचा परिणाम झाला होता. हा सामना दोन तास १५ मिनिटे उशिराने सुरू झाला आणि तो १६-१६ षटकांचा होता. त्याचवेळी गुजरातचा कोलकातासोबतचा मागील सामना पावसामुळे वाया गेला होता. ज्यामुळे गुजरात टायटन्सचा संघ प्लेऑफ्सच्या शर्यतीतून बाहेर पडला. त्याबरोबर हैदराबाद-गुजरात सामना पावसामुळे वाहून गेलेला दुसरा सामना ठरला आहे. गुजरात टायटन्स यांच्यातील सामना पावसामुळे वाया गेला. सततच्या पावसामुळे मैदान संपूर्ण वेळ कव्हरने झाकले गेले होते. त्यामुळे सामना अधिकाऱ्यांनी सामना रद्द केला. ज्यामुळे सनरायझर्स हैदराबादचा संघ प्लेऑफ्समध्ये पोहोचला आहे. हा सामना रद्द झाल्यामुळे हैदराबाद आणि गुजरात या दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला.

### दिल्ली प्लेऑफ्समधून बाहेर

हैदराबादचे आता १३ सामन्यांतून १५ गुण झाले आहेत आणि संघ गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. चेन्नई सुपर किंग्ज वगळता इतर कोणत्याही संघाला १५ किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळू शकत नाहीत. या स्थितीत हैदराबादचा संघ प्लेऑफ्ससाठी पात्र ठरला. हैदराबाद आणि गुजरात यांच्यातील सामना हैदराबादच्या उप्पल स्टेडियमवर होणार होता, मात्र मुसळधार पावसामुळे नाणेफेक होऊ शकली नाही. पाऊस थांबत नव्हता आणि शेवटी रात्री साडेदहा वाजता शेवटची वेळ निश्चित करण्यात आली की पाऊस थांबल्यास दोन्ही संघांमध्ये प्रत्येकी पाच षटकांचा सामना खेळवला जाईल. उप्पल स्टेडियमवर सामना पाहण्यासाठी आलेल्या क्रिकेट चाहत्यांची मात्र हवामानाने निराशा केली.

# स्टेडियममध्ये प्रेक्षकांची तुंबळ हाणामारी

## » क्रिडा विश्वात चर्चेला उधाण : स्टेडियममधील हाणामारीचा व्हिडीओ व्हायरल

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोशल मीडियावर तुम्ही अनेकदा अनेक मजेशीर व्हिडीओ पाहिले असतील. क्रिकेट, फुटबॉल आणि बेसबॉलसह इतर खेळांमध्ये अनेकदा दोन्ही संघांचे चाहते आमनेसामने येतात. यानंतर स्टेडियममध्ये हाणामारी पाहायला मिळते. मात्र, सोशल मीडियावर एक व्हिडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेला व्हिडीओ खेळाच्या स्टेडियमधील आहे.**



या व्हिडीओमध्ये एक मुलगी काही तर कारणावरुन मुलाच्या कानशिलात लगावते. यानंतर तो मुलगा त्या मुलीला मारतो, ज्यानंतर तिचा मित्र मध्ये पडतो, ज्यानंतर जोरदार हाणामारी झाल्याचे या व्हिडीओमध्ये दिसत आहे.व्हायरल होत असेलला हा व्हिडीओ एका स्टेडियममधील आहे, ज्यामध्ये सामना बघायला आलेल्या प्रेक्षकांमध्ये हाणामारी झाल्याची दिसते. या व्हिडीओच्या सुरुवातीला एका मुलीचे पुढच्या सीटवर असलेल्या मुलाशी कोणत्या तरी कारणावरुन वाद होतो. यानंतर मुलगी त्या मुलालच्या कानशिलात लगावते. त्यानंतर संतापलेला मुलगा त्या मुलीला हात उगारतो. त्यानंतर त्या मुलीचा बॉयफ्रेंडमध्ये पडतो आणि जोरदार हाणामारी सुरु होते.या दरम्यान, मुलगी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करते, परंतु पूर्णपणे अपयशी ठरते. मात्र, आजूबाजूला उपस्थित असलेल्या लोकांनी हे प्रकरण शांत केले, मात्र तोपर्यंत दोघांनीही एकमेकांवर बुक्यांचा वर्षाव केला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.मात्र, हा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. याशिवाय सोशल मीडिया युजर्स सातत्याने कमेंट करून त्यांच्या मनोरंजक प्रतिक्रिया देत आहेत. हा व्हिडीओ कोणत्या स्टेडियमचा आहे, हे स्पष्ट झाले नसले तरी सोशल मीडियावर यूजर्स त्याला खूप पसंत करत आहेत. स्टेडियम चाहत्यांनी खचाखच भरल्याचे या व्हिडीओत दिसत आहे. आजूबाजूला लोकांची मोठी गर्दी दिसत आहे. त्याचवेळी या संघर्षाकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे. क्रेझी क्लीप्स नावाच्या युजरने ट्विटरवर व्हिडीओ शेअर केला आहे.

### लोकांनी हे प्रकरण शांत केले

आतापर्यंत सुमारे १८ कोटी लोकांनी हा व्हिडिओ पाहिला आहे. तसेच ८४ हजारांहून अधिक लाइक्स मिळाले आहेत.या व्हिडीओमध्ये एक मुलगी काही तर कारणावरुन मुलाच्या कानशिलात लगावते. यानंतर तो मुलगा त्या मुलीला मारतो, ज्यानंतर तिचा मित्र मध्ये पडतो, ज्यानंतर जोरदार हाणामारी झाल्याचे या व्हिडीओमध्ये दिसत आहे.व्हायरल होत असेलला हा व्हिडीओ एका स्टेडियममधील आहे, ज्यामध्ये सामना बघायला आलेल्या प्रेक्षकांमध्ये हाणामारी झाल्याची दिसते. या व्हिडीओच्या सुरुवातीला एका मुलीचे पुढच्या सीटवर असलेल्या मुलाशी कोणत्या तरी कारणावरुन वाद होतो. यानंतर मुलगी त्या मुलालच्या कानशिलात लगावते. त्यानंतर संतापलेला मुलगा त्या मुलीला हात उगारतो. त्यानंतर त्या मुलीचा बॉयफ्रेंडमध्ये पडतो आणि जोरदार हाणामारी सुरु होते.